# आकाशवाणी पुणे

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

## दिनांक – 04/08/2024 वार –रवीवार

---

**<u>पुणेपाऊस</u>**

पुणे शहर आणि जिल्ह्याच्या काही भागात आज सकाळपासून जोरदार पावसाची संततधार सुरू होती. आता पावसाचा जोर काहीसा कमी झाला आहे. पुण्याला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणसाखळी क्षेत्रात मात्र पावसाचा जोर कायम असून, खडकवासला धरणातून मुठा नदीमध्ये संध्याकाळी पाच वाजता ४५ हजार क्युसेक्स विसर्ग सुरू करण्यात आला आहे. पावसाच्या प्रमाणानुसार त्यात घट अथवा वाढ होण्याचा इशारा पुण्याच्या पाटबंधारे मंडळाच्या अधीक्षकांनी दिला आहे. नागरिकांनी सतर्क राहाण्याचे आवाहन करण्यात आलं आहे.

दरम्यान सिंहगड रस्त्यावरील एकतानगर, निंबज नगर भागात सकाळपासूनच आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. पुणे अग्निशमन दलानं एकता नगर इथून २५ तर निंबज नगर परिसरातून २० नागरिकांची सुटका केली आहे. एकता नगर मध्ये सनसिटी अग्निशमन केंद्र आणि पीएमआरडीए अग्निशमन वाहने तीन बोटींसह कार्यरत आहेत. तसंच परिसरात लष्कराची तुकडीही तैनात करण्यात आली आहे. येरवड्यात शांतीनगर, आदर्शनगर इथंही पाण्याची पातळी वाढल्यानं अग्निशमन दलाकडून शंभर नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे.

पुण्यात होत असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभुमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाला सतर्क राहाण्याच्या सूचना दिल्या असून, नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवणे, निवारा, जेवणाची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले आहेत. उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनीही पूरपरिस्थितीचा आढावा घेतला. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क करत आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. तसंच विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी एकता नगर परिसराला भेट दिली. तिथे युद्धपातळीवर सुरू असलेल्या मदत आणि बचावकार्य यांचा आढावाही घेतला आहे.

**<u>पिंचिपाऊस</u>**

पिंपरी चिंचवड शहर तसंच धरण क्षेत्रात संततधार पावसामुळे, धरणातून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. शहरातल्या पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीच्या पाणी पातळीत सातत्यानं वाढ होत आहे. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी आपत्कालीन यंत्रणेला दक्षतेचे

आदेश दिले आहेत. नदीकाठी बचाव यंत्रणा सज्ज असून, बॉम्बे इंजिनीअरिंग ग्रुप, औंध ब्रिगेड या यंत्रणांना देखील सज्ज ठेवण्यात आलं असल्याची माहिती शेखर सिंह यांनी दिली. तत्काळ मदतीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची तुकडीही बोलवण्यात आली आहे. या पथकानं पालिकेच्या हद्दीतील जुन्या सांगवी भागातील ४० नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवलं. संभाव्य पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर शहरातल्या विविध भागातल्या एक हजार नागरिकांना आज दुपारी निवारा केंद्रात स्थलांतरित करण्यात आलं आहे.

**<u>मतदारनोंदणी</u>**

राज्य विधानसभेच्या निवडणुकीसाठी मतदार नोंदणीची अंतिम मुदत २० ऑगस्ट आहे. केंद्रीय निवडणूक आयोगानं जाहीर केलेल्या सुधारित मतदार यादी पुनरिक्षण योजनेनुसार यावर्षी १ जुलै रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या कोणत्याही नागरिकाला येत्या २० ऑगस्टपर्यंत मतदार यादीत नाव नोंदणीसाठी अर्ज करता येईल. मतदार यादीतील नाव वगळणे, दुरुस्ती आणि आक्षेप यासाठीही याच कालावधीत अर्ज करता येतील.

**<u>झिकापुणे</u>**

पुण्यातल्या झिका रुग्णांची संख्या ६५ झाली आहे. आज सात जणांना झीकाची लागण झाली; यात पाच गर्भवतीचा समावेश आहे. या महिलांच्या बाळांचे स्कॅन नॉर्मल आल्याची माहिती पुणे जिल्हा आरोग्य विभागानं दिली आहे.

**<u>पुणेऔषधसाठा</u>**

पुण्यात औषधविक्रेत्यांच्या तक्रारीनंतर, अन्न आणि औषध प्रशासनाकडून औषधांचा साठा करुन रुग्णांना विकणाऱ्या खासगी डॉक्टरांची तपासणी मोहिम हाती घेण्यात आली आहे. एक ते चौदा ऑगस्ट दरम्यान यासाठी विशेष मोहिम आखली आहे.

**<u>कृषीउत्पन्न</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज सकाळी विविध राज्यातून ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी अभावी भाज्यांचा भावात काहीशी घसरण झाली आहे. अतिवृष्टीमुळे पालेभाज्यांची आवक घटली असून, फळांना चांगली मागणी असल्याने दरवाढ झाली. उद्यापासून सुरू होणाऱ्या श्रावण महिन्यामुळे फुल बाजारात नेहमीच्या फुलांसह शोभिवंत फुलांची मोठी आवक झाली मात्र मागणीअभावी फुलांचे भाव उतरले आहेत.

**<u>पुणेपीकविमा</u>**

पुणे जिल्ह्यातल्या एक लाख ७३ हजार ९३५ हेक्टरवरील पिकांचे क्षेत्र प्रधानमंत्री पीक विमा योजनेत संरक्षित करण्यात आलं आहे. जिल्ह्यातून तीन लाख ३८ हजार ६०७ अर्ज यासाठी दाखल झाल्याची माहिती जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली.

**<u>बुद्धिबळ</u>**

पुण्यात सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ मानांकन स्पर्धेत आठव्या फेरी अखेर विक्रमादित्य कुलकर्णीने सात गुणांसह आघाडी घेतली आहे. तसंच सौरभ म्हमाणे, श्रीराज भोसले साडे सहा गुणांसह संयुक्तरित्या दुसऱ्या स्थानावर आहे.

**<u>रानडेनिधन</u>**

ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या शोभना रानडे यांचं आज सकाळी निधन झालं. त्या शंभर वर्षांच्या होत्या. निराधार महिला आणि मुलांसाठी त्यांनी मोठं काम केलं होतं. केंद्र सरकारनं त्यांना २०११मध्ये पद्मभूषण या नागरी सन्मानानं गौरवलं होतं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी ६ वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**